महाराष्ट्र शासन

# स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,

मौजे-मेडद, ता.बारामती, पुणे

Email ID - gacbaramati@gmail.com Contac No. 9822961494

जा.क्र.जा.क्रं.शाआमरुबा/लेखा विभाग/वखासेपु/दरपत्रक २०२६-२७/ 1024 /२०२६, दिनांक 12/05/2026

## -: दरपत्रक जाहीर सुचना :-

**विषय :-** स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, मौजे-मेडद, ता.बारामती या नवीन संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचे वसतिगृहामध्ये खानावळची (मेस) सेवा पुरवणेकरिता दरपत्रक मागविणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, मौजे-मेडद, ता.बारामती या नवीन संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी संख्या अंदाजे ३०० ते ४०० आहे. त्याकरिता वसतिगृहामध्ये खानावळ (मेस) सेवा पुरविण्याबाबत अनुभवी कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. दरपत्रकाची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

तरी इच्छुक व पात्र कंत्राटदारांनी त्यांची कमीत-कमी दरांची दरपत्रके सिलबंद पाकीटामध्ये अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती यांचे कार्यालयात टपालाने/ पोस्टाने अथवा समक्ष खालील नमुद वेळेत अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावीत.

**निविदा मागविण्याचे वेळापत्रक व इतर विवरण खालीलप्रमाणे -**

| अ.क्र. | बाब | विवरण |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक फॉर्म शुल्क | रु.३०००/- (ना-परतावा) |
| 3 | विनव्याजी सुरक्षा ठेव रक्कम | रु.२,००,०००/- |
| 3 | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी पासुन पर्यंत | दि.12/05/2026 ते दि.19/05/2026 (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय व स्थानिक सुट्टीचे दिवस वगळून) (सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत) |
| 4 | तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ (लिफाफा क्र.०१) | दिनांक - 21/05/2026 वेळ दुपारी 12.30 |
| 5 | दरपत्रक लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ (लिफाफा क्र.०२) | दिनांक - 28/05/2026 वेळ दुपारी 12.30 |
| 6 | तांत्रिक व दरपत्रक लिफाफा उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती शिवनगर विद्या प्रसारक मंडळ आवार, माळेगाव (बु), ता.बारामती, जि.पुणे-४१३ ११५. |



Scanned with OKEN Scanner

स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, मौजे-मेडद, ता.बारामती या संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृहामध्ये खानवळ (मेस) सेवा घेण्याकरीता दरपत्रक प्रसिध्द करुन अनुभवी कंत्राटदाराकडून सेवा घेणे आवश्यक आहे. या महाविद्यालयाची नव्याने स्थापना झाली असुन, सदरील महाविद्यालयाचे मेडद येथे बांधकाम पुर्ण होत आले असून, महाविद्यालयात मुलांचे व मुलीचे वसतिगृहामधील खानावळ मेस चालविणेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणारी जागा हि महाविद्यालयातील असुन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय,क्र.एमआयएस - १०९३/१०५३/सीआर-२१९/९३/प्रशासन-२, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.१६ जून,१९९७ या शासन निर्णयानुसार विना भाडे शुल्क (भाडे मुक्त) असल्याने, खानावळ (मेस) मधील पुरविण्यात येणारे एक वेळ नाष्टा व दोन वेळेचे अमर्याद (फुल) जेवणाचे मासिक दर व प्रपत्र क्र.०२ मध्ये नमूद इतर सर्व खाद्यपदार्थांचे दर हे खाजगी उपहारगृह/मेस/हॉटेल/रेस्टॉरन्ट/कॅन्टीन यांचे दरापेक्षा, बाजारभावपेक्षा न्युनतम दर असून, त्यांचा दर्जाही उत्तम असणे आवश्यक आहे. सदर खानावळ (मेस) विद्यार्थ्याकरीता चालविण्यात येत असल्याने खानावळची मासिक रक्कम विद्यार्थ्याकडुन वसुल करण्याची जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

दरपत्रक अर्ज प्रक्रीया शुल्क रु.३०००/- (रुपये तीन हजार फक्त.) ना-परतावा राहील. सदर शुल्क या महाविद्यालयातील रोखपाल विभागामध्ये रोख रकमेत भरुन त्याची रितसर शासकीय शुल्क पावतीची प्रत या अर्जासोबत जोडत आहे.

निविदा दोन प्रपत्रामध्ये (प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब) भरुन लिफाफा क्र.०१ (प्रपत्र-अ कागदपत्रे) व लिफाफा क्र.०२ (प्रपत्र-ब दरपत्रक) सिलबंद करुन लिफाफावर लिफाफा क्र.०१ (प्रपत्र-अ कागदपत्रे) व लिफाफा क्र.०२ (प्रपत्र-ब दरपत्रक) असे स्पष्ट नमूद करुन सीलबंद लिफाफात टाकावेत व त्यावर **"स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, बारामती या संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृहामध्ये खानावळची (मेस) सेवा पुरवणेबाबत"** असे नमूद करुन सीलबंद लिफाफा संस्थेच्या कार्यालयात विहित कालावधीत सादर करावा. विहित कालावधीनंतर प्राप्त होणा-या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही, तसेच टपालाव्दारे विहित कालावधीनंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र-अ व कागदपत्रे) उघडण्यात येऊन दरपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे ? याबाबत खात्री करण्यात येईल, आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी दरपत्रके अपात्र ठरविण्यात येतील. जे दरपत्रकधारक उपरोक्त प्रक्रियेदरम्यान उपस्थित राहू इच्छितात त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे. लिफाफा क्र.०२ (प्रपत्र-ब व दरपत्रक) उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा क्र.०१ च्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या दरपत्रकधारकांची, दरपत्रिकेची नियुक्त समिती मार्फत अर्हता छाननी करण्यात येईल, दोन किंवा अधिक दरपत्रकधारकांचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलावले जाईल व त्याआधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार उपहारगृह/खानावळ (मेस) व्यवस्थापकीय समितीस व अधिष्ठाता यांना राहतील.

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे दरपत्रके सादर केली आहेत त्याच नावे असणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफे उघडल्यावर व्यवस्थापकीय समितीने मागणी केल्यास सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. दरपत्रक भरण्यापूर्वी दरपत्रक धारकाने उपहारगृहाची



Scanned with OKEN Scanner

पाहणी करावी, दरपत्रक धारकास निविदा भरताना काही अडचण असल्यास किंवा काही बाबतीत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती यांच्याशी संपर्क साधावा.

कोणत्याही क्षणी दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती यांना राहतील.

(वैद्य अनिल भि.काळे)
अधिष्ठाता,
स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
बारामती.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

**स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,**
**मौजे-मेडद, ता.बारामती, पुणे.**

Email ID - gacbaramati@gmail.com ContacNo. **9822961494**

स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, मौजे-मेडद, ता.बारामती येथील खानावळ (मेस) सुविधा दोन लिफाफा पध्दतीने उपलब्धतेबाबत.

निविदा फॉर्म शुल्क रु.३०००/- (रुपये तीन हजार फक्त.)

निविदा फॉर्म

१. निविदा क्र. : २०२६-२७/०१

२. शासकीय पावती क्र. व दिनांक : ..................................................

३. निविदाकाराचे पुर्ण नाव/राहते घराचा : ..................................................

व कार्यालयाचा संपुर्ण पत्ता : ..................................................

४. संपर्क दूरध्वनी क्रमांक : ..................................................

१. कार्यालय : ..................................................

२. निवास : ..................................................

३. मोबाईल : ..................................................

४. मुंबई दुकाने अधिनियम नोंदणी क्र. : ..................................................

(संपूर्ण भरलेला निविदा फॉर्म व त्यासोबत प्राप्त अटी व शर्ती इत्यादी सर्व कागदपत्रे स्वाक्षरी करुन तसेच साक्षांकित करुन लिफाफा क्र.१ मध्ये कागदपत्राच्या यादीनुसार सादर करणे आवश्यक आहे.)

दरपत्रकधारकाचे / संस्थेचे नाव

स्वाक्षरी : दरपत्रकधारकाचा/संस्थेचा शिक्का :



Scanned with OKEN Scanner